॥ ५७७३ ॥ तोडुनी पुष्पवटीका फळवृक्ष याती। बाभळी राखिती करुनी सार ॥ १ ॥ कोण हित तेणें देखिलें आपुलें। आणीक पाहिलें सुख कायी ॥ २ ॥ धान्यें वीजें जेणें जाळिलीं सकळें। पेरितो काळें जिरें वीज ॥ ३ ॥ मोडोनियां वाटा पुढिलांची सोय। आडरानें जाय घेऊनि लोकां ॥ ३ ॥ विषाचें अमृत ठेवूनियां नाम। करितो अधम ब्रम्हहत्या ॥ ४ ॥ तुका म्हणे त्यास नाइके सांगतां। नया हाल करितां पाप नाहीं ॥ ५ ॥

॥ ५७७४ ॥ अवघ्या कोल्ह्यांचें वर्म अंडीं। धरितां तोंडीं खीळ पडे ॥ १ ॥ भुंकुं नका भुंकुं नका। आला तुका विष्णुदास ॥ २ ॥ कवणे ठायीं सादर व्हावें। नाहीं ठावें गाढवा ॥ ३ ॥ दुर्जनासी पंचानन। तुका रजरेणु संतांचा ॥ ४ ॥

॥ ५७७५ ॥ आली सिंहस्थपर्वणी। न्हाव्या भटा झाली धणी ॥ १ ॥ अंतरीं पापाच्या कोडी। वरिवरि बोडी डोई दाढी ॥ २ ॥ बोडिलें तें निवालें। काय पालटलें सांग वहिलें ॥ ३ ॥ पाप गेल्याची काय खूण। नाहीं पालटले अवगुण ॥ ४ ॥ भक्तिभावें विण। तुका ह्मणे अवघा सीण ॥ ५ ॥

॥ ५७७६ ॥ घालुनियां मापीं। देवभक्त बैसले जपीं ॥ १ ॥ तैसी होते सांडउलंडी। निजानिजचीं मुकुंडी ॥ २ ॥ अमुपीं उखतें। आपणवास आपण यातें ॥ ३ ॥ देव आला झाला। उगवे संकोच वाहिला ॥ ४ ॥ अखंड नेलें वेठी। भार सवाविण गांठीं ॥ ५ ॥ आडकिला झोंपा। रिता काळिवराचा खोंपा ॥ ६ ॥ गोदातीरीं आड। करिते करविते द्वाड ॥ ७ ॥ तुका ह्मणे बळें। उपदेशाचें तोंड काळें ॥ ८ ॥

॥ ५७७७ ॥ ज्यासी विषयाचें ध्यान। त्यासी कैंचा नारायण ॥ १ ॥ साधु कैंचा पापीयासी। काय चांडाळासी काशी ॥ २ ॥ काय पतितासी पिता। काय अधमासी गीता ॥ ३ ॥ तुका म्हणे निरंजनी। शठ कैंचा ब्रम्हज्ञानी ॥ ४ ॥

॥ ५७७८ ॥ लोभानरें ठेवुनि हेत। करी असत्य न्याय नीत ॥ १ ॥ त्याच्या पूर्वजां पतन। नरकीं किडे होती जाण ॥ २ ॥ कोटिगोहत्यापातक। त्यासी घडेल निष्टंक ॥ ३ ॥ मासां श्रवे जे सुंदरा। पाजी विटाळ पितरां ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसियासी। यम गांजील सायासी ॥ ५ ॥

॥ ५७७९ ॥ गायत्री विकोन पोट जे जाळिती । तया होय गति यम-लोकीं ॥ १ ॥ कन्येचा जे नर करिती विकरा । ते जाती अघोरा नरकापाता ॥ २ ॥ नाम गाऊनियां द्रव्य जे मागती । नेणों तयां गति कैसी होय ॥ ३ ॥ आमुचा सांगाती आहे जो श्रीहरि । न लगे दुराचारी तुका म्हणे ॥ ४ ॥

॥ ५७८० ॥ साधूच्या दर्शना लाजशी गव्हारा । वेश्येचिया घरा पुष्पें नेसी ॥ १ ॥ वेश्या दासी मुरळी जगाची वोंवळी । ते तुज सोंवळी वाटे कैशी ॥ २ ॥ तुका म्हणे आतां लाज धरी बुच्या । टांचराच्या कुच्या मारा वेगीं ॥ ३ ॥

॥ ५७८१ ॥ बाइले अधीन होय ज्याचें जिणें । तयाच्या अवलोकनें पडिजे द्वाड ॥ १ ॥ कासया ते जंत जिताती संसारीं । माकडाच्या परी गारोड्यांच्या ॥ २ ॥ बाइलेच्या मना येईल तें खरें । अभागी तें पुरें बाइ-लेचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मेंग्या गाढवाचें जिणें । कुतऱ्याचें खाणें लगवगा ॥ ४ ॥

॥ ५७८२ ॥ दगडाच्या देवा बगाड नवस । बाईल कथेस जाऊं नेदी ॥ १ ॥ वेची धनरासी बांधलें स्मशान । दारीं वृंदावन द्वाड मानी । चोरें नागविला न करी त्याची खंती । परी द्विजा हातीं नेदी रुका । करी पाहुणेर व्याह्याजांवयासी । आल्या अतीतासी पाठमोरा ॥ ३ ॥ तुका म्हणे जळो धिग त्याचें जिणें । भार वाही सीण वर्म नेणे ॥ ५ ॥

॥ ५७८३ ॥ दिवसा व्यापारचावटी । रात्रीं कुटुंबचिंता मोठी ॥ १ ॥ काय करूं या मनासी । नाठवे कां हृषीकेशी ॥ २ ॥ वेश्येपाशीं रात्रीं जागे हरिकीर्तनीं निद्रा लागे ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय झालासी । वृथा संसारा आलासी ॥ ४ ॥

॥ ५७८४ ॥ पापिया चांडाळा हरिकथा नावडे । विषयालागीं आवडे गाणें त्याला ॥ १ ॥ ब्राह्मणा दक्षणा देतां रडे रुका । विषयालागीं फुका लुटीतसे ॥ २ ॥ वीतभरि लंगोटी नेदी अतिताला । खीरम्या देतो शाला भोरप्यासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याच्या थुंका तोंडावरि । जातो यमपुरी भोगावया ॥ ४ ॥

॥ ५७८५ ॥ धिग तो दुर्जन नाहीं भूतदया । व्यर्थ तया माया प्रस-वली ॥ १ ॥ कठिण हृदय तया चांडाळाचें । जो नेणे पराचें दुःख कांहीं

॥ २ ॥ आपुला हा प्राण तैसे सकळ लोक । न करी विवेक पशु जैसा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मुर्खें कापीतसे गळे । आपुलिया वेळे रडतसे ॥ ४ ॥

॥ ५७८६ ॥ क्षुधा तृषा कांहीं सर्वथा नावडे । पहावया धांवे कोल्हाटासी ॥ १ ॥ कथेसी साक्षेपें पाचारिला जरी । ह्मणे माझ्या घरीं कोणी नाहीं ॥ २ ॥ बलात्कारें जरी आणिला कथेसी । निद्रा घे लोडेंसीं टेंकुनियां ॥ ३ ॥ तुका ह्मणे थुंका त्याच्या तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ४ ॥

॥ ५७८७ ॥ रामनामाविण तोंड । तें तो चर्मकाचें कुंड ॥ १ ॥ दास नाहीं विठोबाचा । तो हा लेंक दो बापांचा ॥ २ ॥ ज्यासी न आवडे पांडुरंग । तो हा जातीचा हो मांग ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याच दिवशीं । रांड गेली म्हारापाशीं ॥ ४ ॥

॥ ५७८८ ॥ धन्या आतां काय करूं । माझें तान्हूलें लेंकरूं ॥ १ ॥ धन्या अवचित मरण आलें । मज कोणासी निरविलें ॥ २ ॥ माझें दार नका पाडूं । त्याचें हात पाय तोडूं ॥ ३ ॥ एके हातीं धरली दाढी । घे कुऱ्हाडी दुजे हातीं ॥ ४ ॥ येरी घाव घालूं पाहे । तंव तो उठोनि उभा राहे ॥ ५ ॥ तुका ह्मणे अवघीं चोरें । सेखीं रामनाम सोईरें ॥ ६ ॥

॥ ५७८९ ॥ जळो जळो तें सकळ । उत्तम याती उत्तम कुळ ॥ १ ॥ ज्याची वाणी अमंगळ । कान उंदिराचें बीळ ॥ २ ॥ सोडुनियां त्या हरीस । करिती अनेक सायास ॥ ३ ॥ तुका ह्मणे पिशी । वांयां गेली कीर्ति ऐशी ॥ ४ ॥

॥ ५७९० ॥ देउळासी जातां लाजसी गव्हारा । दासीचिया घरा पुष्पें नेसी ॥ १ ॥ संतांसी देखोनी होसी पाठमोरा । दाशीचीया पोरा दाम देशी ॥ २ ॥ संत मागे पाणी नेदी एक चूळ । दासीसी अंघोळ सारी पाणी ॥ ३ ॥ संतांसी देखोनी करीतो ढवाळ्या । दासीचिया चोळ्या धूतो भावें ॥ ४ ॥ तुका ह्मणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ५ ॥

॥ ५७९१ ॥ कथेसी बैसुनी संसाराच्या गोष्टी । चांडाळ तो दृष्टी नको येथें ॥ १ ॥ चंचळ कराल अती खोडकरी । ते ही पापें थोरी नको येथें ॥ २ ॥ तुका ह्मणे भोळे भाविकांचें पायीं । ठाव मज देई पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ५७९२ ॥ मायबापें केली आस । झाला बायकोचा दास ॥ १ ॥ मानी बायकोच्या बोला । सख्या भावासी अबोला ॥ २ ॥ बायकोला धटी-पटी । आईच्या सोंवळ्याला गांठी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐशा नरा । मोजुन माराव्या पैजारा ॥ ४ ॥

॥ ५७९३ ॥ निंदकाचें चित्त सदां निंदेवरी । रात्रंदिवस करी निंदा फार ॥ १ ॥ निंदा न मिळे जरि करी तळमळ । पातकी चांडाळ दुराचारी ॥ २ ॥ निंदकाचे तोंडीं साबणाची वडी । देहाची पासोडी शुद्ध केली ॥३॥ निंदक हा माझा कंठिंचा ताइत । केलें तेणें हित माझें सर्व ॥ ४ ॥ तुका ह्मणे थुंका त्याचे तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ५ ॥

॥ ५७९४ ॥ सखी ते मेहुणी टांचेंचे काळिज । सांगतसे गुज एकांताचें ॥ १ ॥ बायलेचा भाऊ सखा तो मेहुणा । नेतसे भोजना आदरेसीं ॥२॥ बायलेची माय होय सखी मामी । साडी नेसा तुम्ही रेशमाची ॥ ३ ॥ पाठीचा तो बंधू वैरीच दिसतो । वांटा तो मागतो संपत्तीचा ॥ ४ ॥ पाठीची बहीण वैरीण दिसती । जाउंद्या परती सासऱ्याशीं ॥ ५ ॥ ऐसिया पुत्राशिं काय वा करावें । घाण्यासीं जुंपावें तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ ५७९५ ॥ शब्दानें सांगतां देव नये हाता । शब्दा त्या कथा वाउग्याची ॥ १ ॥ मुखें जें बोलावें अंतरीं असावें । त्या देव स्वभावें जवळीच ॥ २ ॥ मुखें बोले एक अंतरीं अनेक । वायां करी शोक तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ५७९६ ॥ खर जो धूतला महा तीर्थामाजी । कदां नव्हे तो जी श्यामकर्ण ॥ १ ॥ ऐसा खळा केला काय उपदेश । नव्हे तें मानस शुद्ध त्याचें ॥ २ ॥ जैसें त्या सर्पासीं पाजीयेलें पीयूष । अंतरींचें वीष जाऊं नेणे ॥ ३ ॥ तुका ह्मणे क्षीरीं श्वानाचें भोजन । सवेंचि वमन होय जैसें ॥ ४ ॥

॥ ५७९७ ॥ उगीच गेलों पंढरपुरीला । घरीं ठाऊक नव्हतें मला ॥१॥ चंद्रभागेचें रेंदा पाणी । नाहीं प्यालों वोंगळ वाणी ॥ २ ॥ गांवा भोंवतालें फिरावें । वेळे उपवासी मरावें ॥ ३ ॥ टाळ मृदंगाचे घाई । माझें कपाळ उठतें बाई ॥ ४ ॥ देऊळासी जातां । तोबे मारिताती हाता ॥ ५ ॥ तुका ह्मणे रांडलेका । जिकडे तिकडे खासी ठोका ॥ ६ ॥

॥ ५७९८ ॥ जेणें केली बहुत मात ॥ ह्मणुनि नामा तो जामात ॥ १ ॥ आला जांवई ऐकोनी । सासु आनंदली मनीं ॥ २ ॥ सांगे बहुता जनांसी ।

आणा चला जांवयासीं ॥ ३ ॥ पंक्ती ब्राह्मण नावडे । मोठें जांवयाचें कोडें ॥ ४ ॥ तुका ह्मणे चित्तीं । अंतीं रांडेची फजिती ॥ ५ ॥

॥ ५७९९ ॥ लाभावरी ठेवुनी चित्त । असत्य करी न्याय नीत ॥ १ ॥ त्याचे पूर्वजां पतन । नरकीं किडे होती जाण ॥ २ ॥ रजस्वला त्या सुंदरा । विटाळ पाजीला पितरां ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यासी । देवा मुक्ती कैसी देसी ॥ ४ ॥

॥ ५८०० ॥ हरिदासाचें हो घेतां दरशन । नरकासी हो जाणें उभयतां ॥ १ ॥ मातेपरिस कथा वाड । घेतां भाड लाज नाहीं ॥ २ ॥ घेतां देतां नरकवासी । उभयतांसी रवरव ॥ ३ ॥ तुका ह्मणे नये गांवा । जाती हावां धरोनियां ॥ ४ ॥

॥ ५८०१ ॥ साखरेचा आळा लाविला लिंबारा । कोण सा गव्हारा बुजाविना ॥ १ ॥ सोन्याची चवई बैसवून दासी । काय शोभा तिसी वरमायेची ॥ २ ॥ आणुनी माकड बैसवी पालखी । दाखविती शेखी आपुला गुण ॥ ३ ॥ तुका ह्मणे किती सांगावें खळासी । आपुले ब्रीदासी न सांडिती ॥ ४ ॥

॥ ५८०२ ॥ हरीजागरासी । कांरे जातांना मरशी ॥ १ ॥ कोठें पाहशील तुटी । आयुष्य वेंचे उठाउठी ॥ २ ॥ तुज आहे ज्यांची गुंती । ते तों मोकलिती अंतीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे अगा खरा । लाभ विचारी तूं बरा ॥ ४ ॥

॥ ५८०३ ॥ नकरी पंढरीची वारी । आह्मी केली मुलुखगिरी ॥ १ ॥ ह्मणे यांतील आहे त्यांत । मूर्खा न कळे संदेह ॥ २ ॥ उपवासी माता पिता । पोशी बायलेच्या गोता ॥ ३ ॥ उपवासी गाई मारी । गोग्रास महीषीस चारी ॥ ४ ॥ श्राद्ध पक्ष जो न करी । करी पितरांची कंदोरी ॥ ५ ॥ तुका ह्मणे ऐसा लंड । फोडा पैजारानें तोंड ॥ ६ ॥

॥ ५८०४ ॥ श्रीहरीची कथा नावडे हो जया । अधम ह्मणों तया वेळ लागे ॥ १ ॥ हीनदेही तया नाट पैं लागेल । अघोर सोसिल कुंभपाक ॥ २ ॥ कासया जन्मासीं आला तो पाषाण । जंतू कां होऊन पडला नाहीं ॥ ३ ॥ उपजे मरोनियां वेळोवेळीं भिडे । परी लाज लंड न धरी कांहीं ॥ ४ ॥ जन्मोजन्मींचा तो होईल नरकीं । तुका म्हणे चुकी नाहीं बोला ॥ ५ ॥

॥ ५८०५ ॥ नरदेहा येउनी न करी भजन । धिक् तो पाषाण भूमीवरी । १ ॥ मेरुतुल्य पृथ्वी दिधलें सुवर्ण । न मिळे एक क्षण नरदेह ॥ २ ॥ हातो गमावीला विषयाचे वोढीं । बुडविली जोडी आयुष्याची ॥ ३ ॥ तुका ह्मणे शाहाणा होयींरे गव्हारा । चौऱ्यांशीं येरझारा फिरुं नको ॥ ४ ॥

॥ ५८०६ ॥ कांरे शिणलासी वाउगा । न भजतां पांडुरंगा ॥ १ ॥ करुनियां तीर्थाटण । वाढविला अभिमान ॥ २ ॥ वांटियेलें धन । केली अहंता जतन ॥ ३ ॥ मान दंभासाठीं । केली अक्षराची आटी ॥ ४ ॥ तुका ह्मणे चुकला वर्म । तेणें अवघाचि अधर्म ॥ ५ ॥

॥ ५८०७ ॥ ब्राह्मणा दक्षणा देतां रडे रुका । वेश्येहातीं फुका लुटवी धनें ॥ १ ॥ वितभरी चिंधोटी नेदी अतीताला । बहुरूपियाला खिरमे टाकी ॥ २ ॥ पान फुलें नेतो वेश्येसी उदंड । ब्राह्मणासी खांड एक नेदी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्यानें केली नर्कजोडी । पुढील परवडी विपत्तीची ॥ ४ ॥

॥ ५८०८ ॥ बहुत गेलीं वांयां । न भजतां पंढरीराया ॥ १ ॥ करी कामिनीची सेवा । लागोन मागो खासा देवा ॥ २ ॥ अवघियांचा धणी । त्यासी गेलीं विसरुनी ॥ ३॥ तुका ह्मणे अंतीं । पडती यमाचिये हातीं ॥ ४॥

॥ ५८०९ ॥ न होतां सावचित्त । तेणें अंतरिलें हित ॥ १ ॥ नामासी विसर पडिला । तेणें संसार वाढविला ॥ २ ॥ लटिकियाचे पुरीं । वाहोनियां गेला दुरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे माव । असा सांपडला देव ॥ ४ ॥

॥ ५८१० ॥ नलगे जीव देणें सहज जाणार । आहे तो विचार करा कांहीं ॥ १ ॥ मरण मागतो गाढवाचा बाळ । बोलतो चांडाळ शुद्ध यातीं ॥ २ ॥ तुका ह्मणे कईं होईल याचें हित । निधान हीं तेथें सांडिताती ॥ ३ ॥

॥ ५८११ ॥ प्रदक्षणा घाली आवा । ह्मणे गोह्रो यावा गांवा ॥ १ ॥ पुण्य कैंचें तया गांठीं । चित्त वेंची लोभासाठीं ॥ २ ॥ करी चतुर्थी सोमवार । ह्मणती पोटीं व्हावें पोर ॥ ३ ॥ परिसाचे सांटे वटी ।

मागतसे गारगोटी ॥ ४ ॥ तुका ह्मणे मोल । देऊन घेतला अ-
मोल ॥ ५ ॥

॥ ५८१२ ॥ साधुसज्जनासी सदा भेटों जाय । शठ वंदी पाय नम्रपणें
॥ १ ॥ ज्याचे गिवसुनी गुणदोष पाहे । दुर्विनीत राहे तया ठायीं
॥ २ ॥ तुका ह्मणे जाणे सर्व ज्याचे भाव । देवा आदिदेव पां-
डुरंग ॥ ३ ॥

॥ ५८१३ ॥ एक शिष्य केला ज्यानें । समस्त गांव जाळिले त्यानें
॥ १ ॥ द्रव्य मागे शिष्यापासी । पूर्वज गेले नरकवासी ॥ २ ॥ नाम
विकी राघोबाचे । जळो काळें तोंड त्याचें ॥२॥ तुका ह्मणे निरपेक्षी । देव सा-
ह्य होय त्यासी ॥ ४ ॥

॥ ५८१४ ॥ कथा करोनियां मोल ज्यापें घेती । तेही दोघे जाती नरका-
मध्यें ॥ १ ॥ ब्रह्म पूर्ण करा ब्रह्म पूर्ण करा । अखंडित स्मरा रामराम
॥ २ ॥ मधुरवाणीच्या नका पडों भरी । जाल यमपुरी भोगावया
॥ ३ ॥ तुका ह्मणे करीं ब्रह्मांड ठेंगणें । हात पसरी जिणें धिग
त्याचें ॥ ४ ॥

॥ ५८१५ ॥ सुन सासुचे ऐकेना । रांड सुदीसी नांदेना ॥ १ ॥ ब-
ळेंच आपण रुसावें । जिव देतें हें ह्मणावें ॥ २ ॥गरीब पाहून दादल्यासी ।
हिसाळती घोडी जैसी ॥ ३ ॥ दादला देखोनियां वेडा । म्हणे माझी इष्टा
फेडा ॥ ४ ॥ ऐसी डंकीण त्या गांवीं ॥ तुका ह्मणे व्हा गोसांवी ॥ ५ ॥

॥ ५८१६ ॥ भजन तें ओंगळवाणे । नरका जाणें चुकेना ॥ १ ॥
काय करावें घोकिलें । वेदपठण वांया गेले ॥ २ ॥ वेदीं सांगितलें तें न
करी । ब्रह्म ह्मणे दुराचारी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कैचें ब्रम्ह । अवघा वि-
षयाचा भ्रम ॥ ४ ॥

॥ ५८१७ ॥ जळो त्याचें तोंड । ऐसी कां ते व्याली रांड ॥ १ ॥ सदा
भोंवयासी गांठी । क्रोध धडधडीत पोटीं ॥ २ ॥ फोडिली गोंवरी । ऐसी
दिसे तोंडावरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ॥ ४ ॥

॥ ५८१८ ॥ भाव धरी तया तारील पाषाण । दुर्जना सज्जन काय
करी ॥ १ ॥ करितां नव्हे नीट श्वानाचें हें पुच्छ । खापरा परीस काय
करी ॥ २ ॥ काय करिल तया साकरेचें आळें । बीज तैसीं फळें येती तया
॥ ३ ॥ तुका ह्मणे वज्र भंगे एकवेळ । कठीण हा खळ तयाहूनी ॥ ४ ॥

॥ ५८१९ ॥ पतिव्रता ऐसी जगामध्यें मात । भोगी पांच सात अंधारीं ते ॥ १ ॥ भ्रतारासी लेखी श्वानाचे समान । परपुरुषीं जाण संभ्रम तो ॥ २ ॥ तुका ह्मणे तिच्या दोषा नाहीं पार । भोगील अघोर कुंभपाक ॥३॥

॥ ५८२० ॥ नाहीं संतांशीं शरण । काय वाचोनि पुराण ॥ १ ॥ ह्मणे विठ्ठलाचा दास । देखोनी परनारीस हांसे ॥ २ ॥ करिती विठोबाची भक्ति । दया धर्म नाहीं चित्तीं ॥ ३ ॥ तेथें नाहीं माझा देव । व्यर्थ श्रमवी हा जीव ॥ ४ ॥ अंगीं नाहीं क्षमा दया । ह्मणती भेट पंढरिराया ॥ ५ ॥ नाहीं धर्माची वासना । काय करोनी प्रदक्षिणा ॥६॥ ऐसें नव्हे भक्तिवर्म । तेथें नाहीं माझा राम ॥ ७ ॥ नये कृपा कांहीं केल्या । नये घाम जीव गेल्या ॥ ८ ॥ जैसी खड्गाची धार । विठ्ठलचरणीं तुका शूर ॥ ९ ॥

॥ ५८२१ ॥ नव्हती हे उसणे बोल । आहाच फोल रंजवण ॥ १ ॥ अनुभव तो बराबरी । नाहीं दुरी वेगळा ॥ २ ॥ पाहिजे तें आलें रुची । काचाकुची काशाची ॥ ३ ॥ तुका म्हणे लाजे आड । त्याची चाड कोणासी ॥ ४ ॥

॥ ५८२२ ॥ नामाविण काय वाउगी चावट । वांया वटवट हरीविण ॥ १ ॥ फुकटची सांगे लोकांचियां गोष्टी । राम जगजेठी वाचे नये ॥ २ ॥ मेळवूनि चाट करी सुरापान । विषयांच्या गुणें मातलसे ॥ ३ ॥ बैसोनि टवाळी करी दुजयाची । नाहीं गोविंदाची आठवण ॥ ४ ॥ बळें यम दांत खाय तयावरी । जंव भेरी दोरी आयुष्याची ॥५॥तुका म्हणे तुला सोडवील कोण । नाहीं नारायण आठविला ॥ ६ ॥

॥ ५८२३ ॥ हरीची हरिकथा नावडे जया । अधम म्हणतां तया वेळ लाग ॥ १ ॥ मनुष्यदेहीं तया नाट लागलें । अघोर साधिलें कुंभपाक ॥ २ ॥ कासया जन्मा आला तो पाषाण । जंत कां होऊन पडिला नाहीं ॥३॥ उपजे मरोनि वेळोवेळां भांड । परि लाज लंड न धरी कांहीं ॥ ४ ॥ ऐशियाची माता कासया प्रसवली । वर नाहीं घातली मुखावरी ॥ ५ ॥ देवधर्माविण चांडाळ हा नर । न साहे भूमि भार क्षणभरी ॥ ६ ॥ राम ह्मणतां तुझें काय तें वेचलें । कां हित आपुलें न विचारिसी ॥ ७ ॥ जन्मो-जन्मींचा होईल नरकीं । तुका म्हणे चुकी जरी यासी ॥ ८ ॥

॥ ५८२४ ॥ स्वप्नींच्या व्यवहारा काळांतर लेखा । जागृतीसी रुका गांठीं नाहीं ॥ १ ॥ तेवीं शब्दज्ञानें करिती चावटी । ज्ञान पोटासाठीं

विकुनियां ॥ २ ॥ बोलाचीच कढी बोलाचाची भात । जेवूनियां तृप्त कोण झाला ॥ ३ ॥ कागदीं लिहिली नांवाची साकर । चाटितां मधुर केवीं लागे ॥ ४ ॥ तुका ह्मणे जळो जळो त्याचें ज्ञान । यमपुरी कोण दंड साहे ॥ ५ ॥

॥ ५८२५ ॥ सर्प विंचू दिसे । धन अभाग्या कोळसे ॥ १ ॥ आला डोळ्यासी कवळ । तेणें मळलें उजळ ॥ २ ॥ अंगाचें भोंवडी । भोय झाड फिरती धोंडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाड । पाप ठाके हिता आड ॥ ४ ॥

॥ ५८२६ ॥ सिंदळीचें चित्त परपुरुषावरी । पति चरमुरी रात्रदिवस ॥ १ ॥ ऐसी ते वोंगळी जाय वो नरका । तिच्या दोषा देखा पति जाय ॥ २ ॥ आपण बुडती पती बुडविती । दोन्ही कुळें नेती अधःपाता ॥ ३ ॥ तुका ह्मणे तिची न करावी संगती । होईल फजिती मागें पुढें ॥ ४ ॥

॥ ५८२७ ॥ आंगीं भरला ताठा । वळणी नये जैसा खुंटा ॥ १ ॥ किती सांगावें त्या डेंगा । हित आद्ळेना आंगा ॥ २ ॥ तुका ह्मणे अनु । मुसळाचें नव्हे धनु ॥ ३ ॥

॥ ५८२८ ॥ करी आणिकांचा अपमान । खळ छळवादी ब्राह्मण ॥ तया देतां दान । नरका जाती उभयतां ॥ १ ॥ तैसें झालें दोघांजणां । मागतिया यजमाना ॥ जाळियलें वना । आपणासहित कांजणी ॥ २ ॥ घडितां दगडाची नाव । मोल क्लेश गेले वाव ॥ तरता नाहीं ठाव । बुडवी तारूं तरतीया ॥ ३ ॥ चोरा दिधला सांटा । तेणें मारियेल्या वाटा ॥ तुका ह्मणे ताठा । हें तंव दोघे नाडती ॥ ४ ॥

॥ ५८२९ ॥ वडिलें दिलें भूमिदान । तें जो मागे अभिळासून ॥ १ ॥ अग्रपुजेचा अधिकारी । श्रेष्ठ दंड यमाघरीं ॥ २ ॥ उभयकुल समवेत । नर्कीं प्रवेश अद्भुत ॥ ३ ॥ तप्तलोहें भेटी। तुका म्हणे कल्प कोटी ॥ ४ ॥

॥ ५८३० ॥ लटिकी ग्वाही सभे आंत । देतां पतित आगळा ॥ १ ॥ कुंभपाकीं वस्ती करूं । होय धुरू कुळेंसी ॥ २ ॥ रजस्वला रुधिर स्रवे । तें चि घ्यावें तृषेसी ॥ ३ ॥ तुका म्हणे जन्मा आला । काळ झाला कुळासी ॥ ४ ॥

॥ ५८३१ ॥ आचरे दोष न धरी धाक । परीपाक दुःखाचा ॥ १ ॥ चांडाळ तो दुराचारी । अंगीकारी कोण त्या ॥ २ ॥ नव्हे संतान

वोस घर । अंधकार कुळासी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें दान । घेतां पत दुःखासी ॥ ४ ॥

॥ ५८३२ ॥ कींविलवाणा झाला आतां । दोष करितां न विचारी ॥ १ ॥ अभिळाषी नारी धन । झकवी जन लटिकें चि । २ ॥ विश्वासिय करी घात । न धरी चित्त कांटाळा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं आला । वृथा गेला जन्मासी ॥ ४ ॥

॥ ५८३३ ॥ घेऊं नये तैसें दान । ज्याचें धन अभिलाषी ॥ १ तो ही येथें कामा नये । नर्का जाय म्हणोनि ॥ २ ॥ विकी स्नानसं ध्या जप । करी तप पुढिलांचें ॥ ३ ॥ तुका म्हणे दांभिक तो । नर्क जातो स्वइच्छा ॥ ४ ॥

॥ ५८३४ ॥ माकडासी सोंग अलंकार बुद्धि । देऊनी फजिती फव सार्चे ॥ १ ॥ आपुले ते गुण दाखवी शेवटीं । भाव दावी पोटीं जाती ऐसे ॥ २ ॥ शिकविलें तैसें दाखवितें भाव । अंतरीं तो आव बुद्धि नाहीं ॥ ३ । तुका ह्मणे नाहीं लागत उशीर । अंतरींचें वर उमटे तें ॥ ४ ॥

॥ ५८३५ ॥ माकडासी सेज उपचार भोज । विलास सहज नानापरी ॥ १ ॥ आपुले स्वभाव दावी जातीपरी । क्षणांत विदारी नासुनिया ॥ २ ॥ जातीचा स्वभाव करील तें काय । केलें नासे कार्य काय जाणे ॥ ३ ॥ तुका ह्मणे तया शिकवितां पुढें । मागील तें रूढ न संडीच ॥ ४ ॥

॥ ५८३६ ॥ शिबिका उत्तम आलंकार चांगले । अंग शृंगारिलें माक डाचें ॥ १ ॥ बैसविलें तेथें न बैसे उगलें । करूनी सांडिले नाश सर्व ॥ २ ॥ तेणें हित सुख वरिष्ट हें होय । स्वभावासी काय करूं शके ॥ ३ ॥ तुका ह्मणे तेथें स्वाभाविक कर्म । दाखवितें श्रम लाभ नेणे ॥ ४ ॥

॥ ५८३७ ॥ ह्मणे म्यां केली काशी । देह ओढाळ जैसी तैसी ॥ १ ॥ तीर्था गेले तीर्थ न झालें । केश बोडून घरा आले ॥ २ ॥ वरी वरी बोडीतो करंटा । अंतरीं वासनेच्या जटा ॥ ३ ॥ तुका ह्मणे लंड । तीर्था जाताती उदंड ॥ ४ ॥

॥ ५८३८ ॥ सरळ नामाचा । घोष न करी कांरे वाचा ॥ १ ॥ तारुण्याचा ताठा । अंगीं श्रेष्ठपण भोगिता ॥ २ ॥ चालतो उताणा । पुंसे विण बांडा सुणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे फुगे । मान ताठली स वांगें ॥ ४ ॥

॥ ५८३९ ॥ राउळासी जातां लाजसी गव्हारा । दासीच्या मंदिरा पुष्पें नेसी ॥ १ ॥ दांत करी काळे मिशा भरी पिळ । फिरवितः डोळे हाल्या जैसा ॥ २ ॥ वांकडी पगडी पयपुसा गोंडे । दासीमागें हिंडे सर्वकाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे जे कां ऐसे आहेत लंड । हाणुनी फोडी तोंड यम त्याचें ॥ ४ ॥

॥ ५८४० ॥ जे कां संताची करिती निंदा । तयां दंडावें गोविंदा ॥ १ ॥ निंदक दंडावे दंडावे । नेऊनी अघोरीं सोडावें ॥ २ ॥ संतांसी करिती पाखांड । त्याचें करावें निखंड ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगेन एक । निंदक श्वानाचे ते लेंक ॥ ४ ॥

॥ ५८४१ ॥ क्षुधा तृषा कांहीं सर्वथा न पाहे । पाहावया जाय कोल्हाट्यासी ॥ १ ॥ कथेसी साक्षेपें पाचारिलें जरी । ह्मणे माझे घरीं नाहीं कोणी ॥ २ ॥ बळात्कारें तरी आणिलें कथेसी । निद्रिस्त लोडासी टेंकोनियां ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याच्या थुंका तोंडावरी । जातो यमपुरी भोगावया ॥ ४ ॥

॥ ५८४२ ॥ पाषाणाचीं घरें होती । सर्व उपयोगी येती ॥ १ ॥ देह अधमाचा गेला । वांयां हरीसी चुकला ॥ २ ॥ पशू देह कामा येती । जगीं अधिकारें गती ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरीविणें । जन्म व्यर्थ विटंबणें ॥ ४ ॥

॥ ५८४३ ॥ करोनियां स्नान झालासे सोंवळा । अंतरींच्या मळा विसरला ॥ १ ॥ उदकांत काय थोडे ते पाषाण । जातातीं धुवोन अखंडता ॥ २ ॥ फुटोनियां निघे अंतरीं कोरडा । पाणी तया जडा काय करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं हरीस शोधिलें । त्याचें सर्व केलें व्यर्थ जाय ॥ ४ ॥

॥ ५८४४ ॥ आयुष्याची केली हाणी । झाला पुत्र दारा धणी ॥ १ ॥ धनमद अंगीं भरे । जैसें माजलें कुतरें ॥ २ ॥ जन्मवरी देव गुरु । केला तयांचा अव्हेरु ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोलूं काय । शिणविली तेणें माय ॥ ४ ॥

॥ ५८४५ ॥ अभाविक वाहवले । गुरु दास पार झाले ॥ १ ॥ गळां बांधिला पाषाण । अहंकार प्राक्तनानें ॥ २ ॥ पूर्व संचिताचें बळ । तया नाडवे गोपाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे बुडणार । कैसा होईल तो पार ॥ ४ ॥

॥ ५८४६ ॥ गासी तरी एक विठ्ठलाचि गाई। नाहीं तरी ठायीं राहे उगा ॥ १ ॥ अद्वैतीं तों नाहीं बोलाचें कारण। जाणिवेचा श्रम करिसी वांयां ॥ २ ॥ तुका ह्मणे किती करावी फजिती। लाज नाहीं चित्तीं निलाजरा ॥ ३ ॥

॥ ५८४७ ॥ झाला बायको आधीन। आज्ञा पाळी मनांतून ॥ १ ॥ आज्ञा भंगितां किंचित। ताडनासी दावी लात ॥ २ ॥ जैसा बाईल कावाडी। ओझें घालुनियां झोडी ॥ ३ ॥ सोडियेलें देवराया। तेव्हां गेली साची रया ॥ ४ ॥ तुका ह्मणे पूर्व पाप। भोगवित आपेआप ॥ ५ ॥

॥ ५८४८ ॥ विंचू सर्प गुणवंत। दुजयास दुःख देत ॥ १ ॥ तत्क्षणीं प्राण हानी। तया होय पापखाणी ॥ २ ॥ तेवि खळ आचरती। पावताती अधोगती ॥ ३ ॥ तुका ह्मणे नारायणा। नको दृष्टी या दुर्जना ॥ ४ ॥

॥ ५८४९ ॥ रजताचे परी खळ। मळ क्षाळिती सकळ ॥ १ ॥ निंदा करिती संतांची। राशी होती पातकाची ॥ २ ॥ बरे उपकारी होती। मरायासी कामा येती ॥ ३ ॥ भक्तांसाठीं निर्मियेले। खळ माझिया विठ्ठलें॥४॥ तुका ह्मणे पापखाणी। हित गेले विसरोनी ॥ ५ ॥

॥ ५८५० ॥ वृथा कष्टली जननी। नऊ मास वागवोनी; ॥ १ ॥ देवां पितरां निरास। झाली जन्मला कां ऊस ॥ २ ॥ धरी फकीराचा संग। पिळे घोंटीतसे भांग ॥ ३ ॥ सोकटीस जीवप्राण। ठेवी सर्व गुंडाळून ॥४॥ तुका ह्मणे हरीविण। भूमीभार तो जन्मून ॥ ५ ॥

॥ ५८५१ ॥ हेंचि बरें वर्म तुला। गोष्टी अशाच शिकला ॥ १ ॥ रुका न मिळे धर्माला। रुपे सांटी दारू प्याला ॥ २ ॥ बाबा म्हणती मुलाला। सख्याधिकारी बंधुला ॥ ३ ॥ स्वप्नीं न पुजी देवाला। द्रव्य नेतसे वेश्याला ॥ ४ ॥ तूपपोळी सोईऱ्याला। दाणा न मिळे भिक्षेला ॥ ५ ॥ तुका ह्मणे सा नराला। कुंभपाकीं वास केला ॥ ६ ॥

॥ ५८५२ ॥ अभिमान उठे अखंड मत्सर। क्रोधाचा विकार बुद्धीहीना ॥ १ ॥ नासला अंतरीं कामादिक खळ। अहंभाव जाळ ध्यान करी ॥ २ ॥ उभ्या पानव्यथा दासी मार्गे नीट। नाईकती भ्रष्ट सांगितल्या ॥ ३ ॥ कैसी सां म्हणावी भलेपण वृत्ती। तुका ह्मणे जाती अधोगती ॥ ४ ॥

॥ ५८५३ ॥ वेडीं तरी बहू वेडीं । चवी नेणे खातां गोडी ॥ १ ॥ कैसीं उघडीं पडलीं । नेणे भांडजन बोली ॥ २ ॥ वेडीं वेडीं आणी मुकीं जन्मबाधिरासारिखीं ॥ ३ ॥ शुद्धि आपुलिया नाहीं । जाणे आणिकांतें कांहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐशा जनीं । नका जाऊं वाटे कोणी ॥५॥

॥ ५८५४ ॥ नाहीं दया चित्त हातीं । व्यर्थ होती आळशी ॥ १ ॥ काय बोलोनियां मुखें । वांया मुख फुंदती ॥ २ ॥ काय त्याचे हातीं लागे । नाहीं त्याग विषया ॥ ३ ॥ तुका ह्मणे फेडा गोंवी । धन्य दावी करूनि ॥ ४ ॥

॥ ५८५५ ॥ न करी आंघोळी । टिळे न लावी कपाळीं ॥ १ ॥ नेणे करूं एकादशी ॥ कांरे शहाणा झालासी ॥ २ ॥ न सांवरे आलंकार । माळ तुळसी अव्हेर ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेडें । नाचों लाजे दिंडीपुढें ॥ ४ ॥

॥ ५८५६ ॥ गुरूच्या शब्दास । नाहीं कोणाचा विश्वास ॥ १ ॥ तेणे स्वाहिताचा नाश । होतो नकळे कोणास ॥ २ ॥ धन माया पुत्र दारा । नर्का आवडी हे थारा ॥ ३ ॥ तुका ह्मणे धरी मनीं । भोग भोगीं निरय-खाणी ॥ ४ ॥

॥ ५८५७ ॥ वंशीं पुत्र झाला ऐसा । नर्का धाडी पितरांस ॥ १ ॥ त्याचा संग नका कोणी । भार न साहे मेदिनी ॥ २ ॥ करी चाहाडी तो नित्य । दोष सांचले अमित ॥ ३ ॥ करी तस्कराचें कर्म । होती मागिलासी श्रम ॥ ४ ॥ द्रव्यासाठीं लोकां मारी । झाला जरी परद्वारी ॥ ५ ॥ तुका ह्मणे झाला । वंशा कुऱ्हाड जन्मला ॥ ६ ॥

॥ ५८५८ ॥ दुराचारी पुत्र वंशीं । त्याचा धाक पितरांसी ॥ १ ॥ व्यर्थ जन्मला पाषाण । भुमीभार निःकारण ॥२॥ तुका ह्मणे माता खळ । नाहीं साधियेली वेळ ॥ ३ ॥

॥ ५८५९ ॥ कथा नावडे तें नाम । त्यासी धाम यमाचें ॥ १ ॥ माता जागे नावडेसी ॥ नर्कवासी अकल्प ॥ २ ॥ संतवाक्या त्रास मानी । झाली हानी सुकृता ॥ ३ ॥ तुका अविश्वासी जया । देव तया पाषाण ॥ ४॥

॥ ५८६० ॥ गुरूच्या प्रसादें । कांहीं बोलियलें सुधें ॥ १ ॥ मानी अनुभवीं खरें । पुढें अभावीं काई रे ॥ २ ॥ केलें सांगितलें । तया हित फळा आलें ॥ ३ ॥ तुका म्हणे नष्ट । करी संतजना चेष्टा ॥ ४ ॥

॥ ५८६१ ॥ न करिती एकादशी । आल्या जागरा अळशी ॥ १ ॥ पुढें कोठें ऐसा लाभ त्यागी उपाय सुलभ ॥ २ ॥ मुक न साहे तहान । निद्रा नायके कीर्तन ॥ ३ ॥ तुका ह्मणे आहे खासी । नर्का जाणें अगत्यासी ॥ ४ ॥

॥ ५८६२ ॥ वर्जिली पंढरीची वारी । ह्मणे म्यां केली मुलुखगिरी ॥१॥ ह्मणे यांतिल आलें खांत । मुर्खा नकळे स्वहित ॥२॥ नित्य कंटाळे स्नानासी । विळे पोहे एके दिशीं ॥ ३ ॥ दुधासाठीं गाईला मारी । गोग्रास ह्मशीला चारी ॥ ४ ॥ न करी वैश्वदेव उपासना । तुपभात वाढी श्वाना ॥ ५ ॥ हट्टें जेवी एकादशी । रागें उपवासी एके दिशीं ॥ ६ ॥ श्राद्धपक्षा हेळणा करी । वर्षापिराची कंदूरी ॥ ७ ॥ तुका ह्मणे ऐसा लंडा । जेथें भेटे तेथें दंडा ॥ ८ ॥

॥ ५८६३ ॥ गाईला देखुनी वदबदां मारी । घोड्याची चाकरी गोड वाटे ॥ १ ॥ सोइऱ्यास करी पाहुणेर बरा । कांडवी ठोंबरा संतांलागीं ॥ २ ॥ पांन फुलें नेतो वेश्येला उदंड । ब्राम्हणासी खांड देखों नेदी ॥ ३ ॥ पर्वकाळमासीं न टाके सुपारी । वेंची राजद्वारीं द्रव्यराशी ॥ ४ ॥ बाइलेच्या गोता आवडीनें पोसी । माता पितृव्यासी भुरंडीत ॥ ५ ॥ तुका म्हणे ऐसे पडती आघोरीं । आगि जाच करी यमराव ॥ ६ ॥

॥ ५८६४ ॥ डोळां भरे धुर । धन संपत्ती वेव्हार ॥ १ ॥ अंगीं जातिवेचा ताठा । घाली वयसेचा जेठा ॥ २ ॥ डोळां पातलें पटल । दृष्टी झाकीसे वेंबळ ॥ ३ ॥ तुका म्हणे भरे । आंगीं मदाचें कां वारें ॥४॥

॥ ५८६५ ॥ दैन्यवाणा दिसे संसारींचा दास । धरिला वेठसि बेगारिया ॥ १ ॥ करितां श्रमेना कष्ट तेही नाना । किंचित मानिना दुःख त्याचें ॥ २ ॥ प्रपंच जयानें केला हा निर्माण । तयाचें चिंतन विसरला ॥ ३ ॥ विसरूनी देव कुळींचा हा धर्म । स्नान संध्या नेम त्याग केला ॥ ४ ॥ तुका म्हणे खुंट नयेची वळणा । कुचराचा दाणा शिजों नेणे ॥ ५ ॥

॥ ५८६६ ॥ अडवोनी लोकां दीन दुर्बळासी । व्याजी लेख त्यासी आठवडे ॥ १ ॥ मासा भर आठां दिवसां पंधरा । मुदतीस दारा उभा ठाके ॥ २ ॥ न देतां चित्त या शिव्यादेती तया । भगिनी या माया एकमेकां ॥ ३ ॥ करी बडबड तोंडापाशीं हात । एक एका देत गाळीया-

सी ॥ ४ ॥ तुका ह्मणे अंतीं यमाचे संगती । सोसुनी फजिती नर्की पडे ॥ ५ ॥

॥ ५८६७ ॥ पती सांडुनीयां गुरु करिती रांडा । कलियुगीं भांडा व्यभिचारिणी ॥ १ ॥ नामाचा तो गुरु भोग त्या शरीरा । देती कीं दुर्धरा महादुष्टा ॥ २ ॥ ताडानियां खांब भेटवील यम । जाणावें तें प्रेम रांडांलागीं ॥ ३ ॥ तुका म्हणे तया नरकाची स्थिती । सांपडल्या हातीं यमाचिया ॥ ४ ॥

॥ ५८६८ ॥ तयावरी माझी काय ब्रिदावळी । भ्रष्ट येच काळीं क्रियाहीन ॥ १ ॥ आतां थुंका थुंका त्याचे तोंडावरी । निवालितां थोरी त्याग वांयां ॥ २ ॥ बाइलेचा दास पितरां उदास । भीक भिकाऱ्यांस नेदी दारा ॥ ३ ॥ विद्याबळें वाद करुनियां छळी । आणिकांसी फळी मांडुनियां ॥ ४ ॥ तुका ह्मणे नटें दाऊनियां सोंग । लवों नेदी अंग भक्तिभावें ॥ ५ ॥

॥ ५८६९ ॥ सासुनें केली होती सुन । सासू गेली ती मरून ॥ १ ॥ सासू मेल्या रडे सुन । भाव अंतरींचा भिन्न ॥ २ ॥ मोलें घातलें रडाया । डोळां असूं नाहीं माया ॥ ३ ॥ आशेसाठीं गुंतल्या बाया । तुका ह्मणे गेल्या वांयां ॥ ४ ॥

॥ ५८७० ॥ सहजें आळस । वरी गुरुचा उपदेश ॥ १ ॥ मग कैंची आडकाठी । त्यासी विटाळाची भेटी ॥ २ ॥ नाचरावें कर्म । नव्हे उचित तो धर्म ॥ ३ ॥ तुका ह्मणे ते गाढव । घेती मनामागें धांव ॥ ४ ॥

॥ ५८७१ ॥ देवब्राह्मणांसी न जाय शरण । दासीचे चरण भावें वंदी ॥ १ ॥ संतासी देखुनी करितो टवाळ्या ॥ भावें धुतो चोळ्या दासिचिया ॥ २ ॥ तुका म्हणे ऐसे जे मुर्ख जहाले । जन्मोनियां गेले भारवाही ॥ ३ ॥

॥ ५८७२ ॥ घरीं अखंड जांवई । कर्ज काढी सासूबाई ॥ १ ॥ ऐसें मायेचें लक्षण । तुम्ही पहावें शोधून ॥ २ ॥ दारीं ब्राम्हण भिक्षा मागे । नाहीं म्हणुनी सुनें सांगे ॥ ३ ॥ आशेसाठीं भुलल्या बाया । तुका म्हणे गेल्या वांया ॥ ४ ॥

॥ ५८७३ ॥ अवचित लावी अग्न ॥ विष दान मोलाचें ॥ १ ॥ वृत्ती हरी बलात्कारें । खोटें खरें न पाहे ॥ २ ॥ रवरव कुंभपाक । भ-

थानक अघोर ॥ ३ ॥ दुःख भोगी बहु काळ । तो चांडाळ कुळेंसी ॥ ४ ॥ सुटालिया वांया जाय । बधिर होय पांगुळा ॥ ५ ॥ जीव नाहीं हात खुळे । फुटले डोळे गर्भांध ॥ ६ ॥ तेज नाहीं अंगकांती । अंगें वहाती दुर्गंधी ॥ ७ ॥ तुका म्हणे केला सांठा । बुद्धि फांटा दोषांचा ॥ ८ ॥

॥ ५८७४ ॥ दया नाहीं हृदयचित्तीं । काय वाचोनियां पोथी ॥ १ ॥ नाहीं धर्माची वासना । काय घालोनी प्रदक्षणा ॥ २ ॥ नाहीं संतप-हंतां मान ॥ काय वाचोनी पुराण ॥ ३ ॥ तुका म्हणे हे किती । नरका गेले पुढें जाती ॥ ४ ॥

॥ ५८७५ ॥ चंद्रकळा चोळी आणा । तेव्हां उदक देईन स्नाना ॥ १ ॥ सोनसळे आणा गहूं । मग मी तुम्हा घालीन जेऊं ॥ २ ॥ माझी हौस न पुरविली । मज दुल्लड नाहीं केली ॥ ३ ॥ तिखट जाहली गे कढी । ऐसें म्हणतां धरली दाढी ॥ ४ ॥ तुका म्हणे बाइल खोटी । तेथें कैंची सुखगोष्टी ॥ ५ ॥

॥ ५८७६ ॥ जाय तिकडे पिडी लोकां । जोडी भांडवल थुंका ॥ थोर झाल्या चुका । वर कां नाहीं घातली ॥ १ ॥ भुमी कांपे त्याच्या भारें । कुंभपाकाचीं शरीरें ॥ निष्ठुर उत्तरें । पापदृष्टी मळीण चित्त ॥ २ ॥ दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे खळ । म्हणोनि-यां सिद्धतो ॥ ४ ॥

॥ ५८७७ ॥ मुखें बोलतो वाचाळ । अंतरीं विषय सकळ ॥ १ ॥ शरीर जहालेंसे मलीन । बहु भरले दुर्गुण ॥ २ ॥ काम क्रोध हेला-वती । दश इंद्रियें फांकती ॥ ३ ॥ तुका म्हणे कांहीं । साची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ५८७८ ॥ जेथें वसे थोरपण । तेथें कैंचा नारायण ॥ १ ॥ मीच एक थोर जाण । ऐसें मिरवी भुषण ॥ २ ॥ अंगीं भरलासे ताठा । गळा घालोनियां गेठा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं । साची भीड मला नाहीं ॥ ४ ॥

॥ ५८७९ ॥ आह्मी जातो वाराणसी । जतन करा गाई म्हशी ॥ १ ॥ हात लावाल पेंवतोंडा । वरील खावा कण्या कोंडा ॥ २ ॥ ब्राह्मणासी घालाल अन्न । तरी काशाल माझी मान ॥ ३ ॥ पाहुणा राउळ येईल घरा । तुह्मी निःशंक धोंडे मारा ॥ ४ ॥ कोण येईल आप्त सखा । तुह्मी चुल पे-टवूं नका ॥ ५ ॥ तुका ह्मणे परतोन येसी । नाहीं भरंवसा देहासी ॥ ६ ॥

॥ ५८८० ॥ स्मरे रामनामा । त्यासी ह्मणे जो रिकामा ॥ १ ॥ काय त्याचें व्यर्थ जिणें । खळवादी तो दुर्जन ॥२॥ तीर्थ व्रत करी । तया ह्मणतो भिकारी ॥ ३ ॥ करी धर्म दानें । त्यासी अभागिया ह्मणे ॥ ४ ॥ जप तप नेम । ह्मणे करी त्या अधम ॥ ५ ॥ भाविक जो भोळा । त्यासी म्हणती दुबळा ॥ ६ ॥ तुका म्हणे अंतीं । यमपुरीं त्यासी वस्ती ॥ ७ ॥

॥ ५८८१ ॥ चाटी आपुल्या भोवतें । मारी लातें पारिखा ॥ १ ॥ जन मुललेंसे देवा । मिथ्या हेवा वाढवी ॥ २ ॥ गळ गिळितसे मासा । प्राण आशा घेतला ॥ ३ ॥ तुका ह्मणे बोकड मोहो । धरी पाहो फाटीका ॥ ४ ॥

॥ ५८८२ ॥ हात विषयाचे संगीं । नेणे सुटका अभागी ॥ १ ॥ शास्त्रें केला लुंडा । तरी पढीयेला धोंडा ॥ २ ॥ सर्व मोक्ष नाहीं ठावा । काय सांगावें गाढवा ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्ञानगड । सुखें, पावो देवा नाड ॥ ४ ॥

॥ ५८८३ ॥ तिळ तिळ पुण्य कष्टें साधियेलें । भरीं तें पडलें संसाराच्या ॥ १ ॥ नाहीं शुद्धि देह मी कोण कोठील । करितों सांचलें काय त्यावें ॥ २ ॥ कुटुंबाच्या भिडे पुण्याचा विकरा । आयुष्य मातेरा होय त्याचा ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्यांनीं विकियेलें पुण्य । मातेचें गमन पाप लागे ॥ ४ ॥

॥ ५८८४ ॥ ऐसा कांहो आला वांटा । हीन भाग्याचा करंटा ॥ १ ॥ देव ना संसार । दोहीं ठायीं नाहीं थार ॥ २ ॥ हातीं धरुनियां जिवें । तेणें परतेंचि व्हावें ॥ ३ ॥ तुका म्हणे पीक । भूमी न देईच भीक ॥ ४ ॥

॥ ५८८५ ॥ बहु होता भला । परी रांडेनें नाशिला ॥ १ ॥ बहु प्रवीण ते झालं । खरें खोटें वेंचे वेळे ॥ २ ॥ नव्हे आळविता कोणी । इणें केला जगा ऋणी ॥ ३ ॥ ज्याचें त्यास नेदी देवूं । तुका ह्मणे घाली धाऊ ॥ ४ ॥

॥ ५८८६ ॥ तुम्हां झांकूं वसा । परी नकळे या धसा ॥ १ ॥ कूट खाती मागें पुढें । जाती निरयगांवाकडे ॥ २ ॥ माझी म्हणताती कवी । पापी निशेतुनी जेवी ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगा । आतां कोण लेखी जगा ॥ ४ ॥

॥ ५८८७ ॥ हरिदासां भेटी देती । दोघे जाती नर्कासी ॥ १ ॥ माते परीस थोडी कथा । भाड घेतां न लाजे ॥ २ ॥ घेतां देतां नर्क-

वास । उभयतांसी रवरव ॥ ३ ॥ तुका म्हणे निरयगांवा । जाती ह्यांवा धरोनी ॥ ४ ॥

॥ ५८८८ ॥ काय आइकतो द्वाड । आल्या याचका बोभाट ॥ १ ॥ नको विश्वासों यावरी । चोर देहाचे खाणोरी ॥ २ ॥ तैसी हेचि ह्याची जोडी । सदा बोडुक उघडी ॥ ३ ॥ तुका म्हणे न्यावें । ज्याचें त्यासी आहे ठावें ॥ ४ ॥

॥ ५८८९ ॥ सर्व सोपें आलीं त्या घरीं वस्तीला । त्याचीच घडला दोष ऐसा ॥ १ ॥ कन्या विकुनीयां घे द्रव्य मोजून । तितुका त्या जाण नर्क जाच ॥ २ ॥ कथा आणी गाई जे कोणी विकती । तितुके त्या होती जाच बाधा ॥ ३ ॥ तुका म्हणे जया घडलिया दोन्ही । नर्काची हे खाणी भोगतील ॥ ४ ॥

॥ ५८९० ॥ मासाचा विक्रय जाणावें तें पाप । असे वज्रलेप भविष्य हें ॥ १ ॥ सांभाळरे पुढें ऐका तरी कोणी । बहुत जाचणी आहे पुढें ॥ २ ॥ कन्या गौ कथा घडला विक्रय । नर्कामाजी जाय समूळेसी ॥ ३ ॥ नर्की जाच होती भोगिली विपत्ती । पुढें जन्म होती मार्जाराचे ॥ ४ ॥ पिलें चोरूनियां खात असे बोका । तुका ह्मणे लेखा पाप नसे ॥ ५ ॥

॥ ५८९१ ॥ विकी कन्या गाई कथा स्नान जप । तेथें बसे पापसदा काळीं ॥ १ ॥ भरे पोट वरी मोलाचे मजूर । वेंचती साचार भाडेकरी ॥ २ ॥ भाडेकरी कष्ट करितां श्रमेना । शिणतां जोडेना पुण्य लेश ॥ ३ ॥ पुण्य गांठीं कांहीं न पडेचि लेश । अंतीं नर्कवास कल्पवरी ॥ ४ ॥ तुका ह्मणे त्यासी नये कांहीं हातीं । तोंडीं घेतो माती पाडोनियां ॥ ५ ॥

॥ ५८९२ ॥ रामकृष्ण नये वाणी । नर्क खाणी त्या वस्ती ॥ १ ॥ नाम नवजे ज्या वाचा । तोचि साचा राक्षस ॥ २ ॥ नये देवाचा विश्वास । कोण त्यास रक्षील ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतसेवा । घडे जिवा विश्रांति ॥ ४ ॥

॥ ५८९३ ॥ भाव नाहीं तीर्थी ॥ केले नेम वायां जाती ॥ १ ॥ आपुल्या आपण । काय करी प्रदक्षणा ॥ २ ॥ नित्यानित्य गाळी । भक्ति दुषिली चांडाळीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोठें । त्यांचें प्रारब्धही खोटें ॥ ४ ॥

॥ ५८९४ ॥ झाले घरीं कवी । नेणे प्रसादाची चवी ॥ १ ॥ लंडा भुपणांची चाड । पुढें न विचारी नाड ॥ २ ॥ काढावें आईतें । तेचि जोडावें स्वहितें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळे । परी होताती आंधळे ॥ ४ ॥

॥ ५८९५ ॥ घरचिया लोकां सदा खाय दाढां । बाहेरी बापुडा दीनरूप ॥ १ ॥ शक्तिविण करी व्यर्थ बडबड । ज्याचें मुखीं भंड बाजागारी ॥ २ ॥ कामी कामनिक काळसे कपाळीं । पोंचट जवळी चिंध्याभार ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्य तोचि एक मुर्ख । हित ते पारिख विष तुल्य ॥ ४ ॥

॥ ५८९६ ॥ लागे बळकट पाठीं । लज्जा मोठी म्हणतां ॥ १ ॥ नेतां दर्पण सन्मुख । दिसे नाक नकटें ॥ २ ॥ जळो ऐसें जिणें काय । जेणें होय मरण ॥ ३ ॥ तुका ह्मणे धिग ऐशीं । सुख त्यांसीं संसारीं ॥ ४॥

॥ ५८९७ ॥ वांयां ऐसा जन्म जावा । ऐशा हांवा वर्तवी ॥ १ ॥ हांव संसाराची भारी । डरडरी सरेना ॥ २ ॥ भय न धरीतां कष्ट । चित्तीं विट ने गेंची ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळव्यथा । भोग देतां कळेल ॥ ४ ॥

॥ ५८९८ ॥ नाहीं संतांसीं समान । राजद्वारीं उभा सुन ॥ १ ॥ काय करावें धोविलें । थोरपण वांयां गेलें ॥ २ ॥ करी पोटाचे आर्जव । नाहीं खाया जाय जीव ॥ ३ ॥ तुका ह्मणे विद्या । कां बा बुडविली नद्या ॥ ४ ॥

॥ ५८९९ ॥ जितां आटीतो संसार । मेल्या यमाचा किंकर ॥ १ ॥ शेखी हें ना तैसें झालें । बोल तेही वांयां गेले ॥ २ ॥ जिता भोगी दुःख । अंतीं भोगी कुंभपाक ॥३॥ तुका ह्मणे साला । व्यर्थ तुझा जन्म झाला ॥४॥

॥ ५९०० ॥ थोडाचि वेव्हार । सदा हिंडे दारोदार ॥ १ ॥ काय म्हणावें सा मुर्खा । जोडी जोडीतसे पैका ॥ २ ॥ कोणा करणें हें ध्यान । सांचीतसे दीनपण ॥ ३ ॥ काय उणें तुज मागे ॥ देतां भागे पांडुरंग ॥ ४॥ नाईके सांगतां । मुख नाहीं दिनानाथा ॥ ५ ॥ तुका ह्मणे पाही । देतो बैसलिये ठायीं ॥ ६ ॥

॥ ५९०१ ॥ उतावेळ आधीं । हीन अविचारी बुद्धी ॥ १ ॥ पाप सांचिलेंसे खोट्या । भृत्य फुका साठीं भेट्या ॥ २ ॥ न देतां ही मोल । झाला बेगारिया बैल ॥ ३ ॥ एका गुणें घेतां । पुढें शिव्या मार देतां ॥४ ॥ तुका ह्मणे तें कर्मणा । कधीं करूं नये मना ॥ ५ ॥

॥ ५९०२ ॥ धरुनी अखंड पराविची आशा । सांडी सावकाश प्रेमसुख ॥ १ ॥ घरांत विवेक सर्वांसी उमज । सभेमाजि लाज धरीतसे ॥ २ ॥ तुका ह्मणे शब्द बोलतां निर्बुजे । स्वहिताचें गुज नेणे मुर्ख ॥ ३ ॥

॥ ५९०३ ॥ दृष्टी सुरळीत । वाचा बोलूं अप्रभीत ॥ १ ॥ कांरे न घेसी समर्थ । हेंचि नाम श्रीअनंत ॥ २ ॥ कांरे सकुमार होसी । काय यमा जाव देसी ॥ ३ ॥ तुका म्हणे हरीजन । त्यासी नव्हेचि नमन ॥ ४ ॥

॥ ५९०४ ॥ लाभे नरदेह नाम नेघे ओठीं । टांचराचे साठीं अर्धवाट ॥ १ ॥ चांडाळाचे वंशीं जन्मला कुऱ्हाडी । परद्वारें धाडी कुळा नर्का ॥ २ ॥ नका कोणी करूं रांडेची संगती । घाली अधःपातीं यमदूत ॥ ३ ॥ तुका ह्मणे जया नाहीं देवा चाड । ह्मणोनी थोबाड फोडी काळ ॥ ४ ॥

॥ ५९०५ ॥ दोष न धरी ते धाक । परिपाक दुःखाचे ॥ १ ॥ चांडाळ तो दुराचारी । अंगिकारी कोण त्या ॥ २ ॥ नव्हे संतान ओस घर । अंधःकार कुळासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचें दान । घेतां पतन दुःखासी ॥ ४ ॥

॥ ५९०६ ॥ बोलाव्याचा त्यासी । नको संबंध मानसीं ॥ १ ॥ जया घडे संतनिंदा । तुज विस्मीत गोविंदा ॥ २ ॥ जळो त्याचें तोंड । नको दृष्टी पुढें भांड ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । तयादूरी मज ठेवा ॥ ४ ॥

॥ ५९०७ ॥ माय बाप करी चिंता । पोर नायके सांगतां ॥ १ ॥ नको जाऊं देऊळासी । नेतो बागुल लोकांसी ॥ २ ॥ कर्णद्वारें पुराणिकें । शब्द लावोनियां भीक ॥ ३ ॥ वैष्णवां संगती । हानी पडे सांगों किती ॥ ४ ॥ आह्मा कैंचा मग । करी उघड्याचा संग ॥ ५ ॥ तुका ह्मणे नर्का । त्याचा उपदेश ऐका ॥ ६ ॥

॥ ५९०८ ॥ भरी हेंदऱ्याचे कान । हाले नाम घेईना ॥ १ ॥ नाहीं येथें सांगों स्पष्ट । भावें नष्ट करीना ॥ २ ॥ वाटे अवगुणीं चित्त । तया हीत दुर्लभ ॥ ३ ॥ तुका ह्मणे भांडखोरा । उगी बरा राहता ॥ ४ ॥

॥ ५९०९ ॥ काय ही अकीर्ति । आइकोनियां फजिती ॥ १ ॥ जरी दावी वदन । थुंका थुंका तो देखोन ॥ २ ॥ काळिमेचें जिणें । राहे जेऊनियां सुनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुण । साचें सजावें दर्शन ॥ ४ ॥

॥ ५९१० ॥ काळावरी दृष्टि देती अभागिये । न विचारि काय करी वस्तु ॥ १ ॥ घात आहे पुढें नेणती हें मूढ । कठिण हा द्वाड मुढ आहे ॥ २ ॥ न पुसतां जाती कंटकाच्या राना । चुकलिया कोणा पंथ पुसे ॥ ३ ॥ आडवाटे जातां कैंची लागे सोय । तुका ह्मणे होय जिणी याची ॥ ४ ॥

॥ ५९११ ॥ रिकामटी नाहीं वाचाळ करितां । घडी त्या अनंता आठवीना ॥ १ ॥ ह्मणावे तें काय तया मूर्खासवें । जें जें कां सांगावें पर-वडे ॥ २ ॥ कळोनियां नेणे करीतों मी काय । पुढें कैसें होय न कळेचि ॥ ३ ॥ संचितसें जोडी पतनाची इच्छा । होईल अवस्था पुढें कैसी ॥ ४ ॥ तुका ह्मणे जाती ऐसे ते अघोरा । यमाच्या पैंजारा खाती शिरीं ॥ ५ ॥

॥ ५९१२ ॥ नाहीं भय धाक वाडिलांचा मोळा । न करी चांडाळा काय ह्मणों ॥१॥ नाहीं ते अनुज्ञा वेदांची मर्यादा । अप्रमादी निंदा करी-तसे ॥ २ ॥ न करी स्वहित सांगितली मात । पुढें असे घात काळ पाश ॥ ३ ॥ पसरोनि मुख बैसला जवळी । पुढें तरी नळी चेपावया ॥ ४ ॥ तुका ह्मणे जैसा मत्स्यालागीं बक । अधम ते लोक ग्रासितसे ॥ ५ ॥

॥ ५९१३ ॥ अंगाच्या भोवणीं चावळे भलतें । न पाहे पुरतें मागें पुढें ॥ १ ॥ भ्रमलें भ्रांतीनें ओस दाही दिशा । दिसताती फांसा भवमूळ ॥ २ ॥ तारुण्याचा मद अंगीं भरे ताठा । अंतरींचा खोटा रंग दावी ॥ ३ ॥ मागें नेणें कांहीं न पाहीच पुढें । जाणोनियां पुढें घात करी ॥ ४ ॥ तुका ह्मणे खातो अविचारी साच । यमा घरीं मोचे मोजोनियां ॥ ५ ॥

॥ ५९१४ ॥ करी दुर्जनांसी साह्य । दंड लोहे तोही हा ॥ १ ॥ काय शिंदळीचा बाटा । संग खोटा खोट्याचा ॥ २ ॥ येरा कांचणीस भेटे । आंगीं उठे तेथोनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांपूं नका । पुढें देखा शिकवी ॥ ४ ॥

॥ ५९१५ ॥ जाया अलंकार । होती बुडउनी चोर ॥ १ ॥ त्यासी ताडनाची पुजा । येणें घडे बऱ्या वोजा ॥ २ ॥ अभिलाषी सुखें । अंतीं होती काळीं मुखें ॥ ३ ॥ तुका ह्मणे चोरा । होय भूषण मातेरा ॥ ४ ॥

॥ ५९१६ ॥ एकीं हट केला । देह असंत पीडिला ॥ १ ॥ देवा ठायीं भाव । संत मानीतो अभाव ॥ २ ॥ आपुल्याच बोलें । काय पुढें भांबा-वले ॥ ३ ॥ तुका ह्मणे तोंड । जाणविती तें कुंड ॥ ४ ॥

॥ ५९१७ ॥ नेणे पुढीलांची सोय । बळा न्याय जोडिती ॥ १ ॥ काय सांगों ऐशा जना । अवगुणां न सोडी ॥ २ ॥ करुनियां उग्र तप । सांची पाप नसतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे अप्रमादी ॥ पडे बंदीं यमाच्या ॥ ४ ॥

॥ ५९१८ ॥ जाणे पापकर्म । करी अनाचारीं श्रम ॥ १ ॥ काय प्रारब्धाची गती । स्वल्प सोपें न करिती ॥ २ ॥ असत्य वचन । सदा बोलती दुर्जन ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेगें जाय । नर्का दोषियाची माय ॥ ४ ॥

॥ ५९१९ ॥ आन एक तया घरीं । दोषां उरी नसेचि ॥ १ ॥ नाहीं थोर सान परी । वर्ते येरी सारिखें ॥ २ ॥ समब्रह्म ह्मणे मुखें । करी सुखें पापासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांगों काय । नाहीं सोय धर्माची ॥ ४ ॥

॥ ५९२० ॥ निगमांची आज्ञा शिरीं । निरंतरी अतीत ॥ १ ॥ काय म्हणावें त्या मुढा । होत वेडा जाणोन ॥ २ ॥ सत्य सुकृत त्यागुनी । दोष मनीं सांचिती ॥ ३ ॥ तुका ह्मणे मायझवा । जातो हांवा नर्कासी ॥ ४ ॥

॥ ५९२१ ॥ सुसुत्र नामाचा । घोष न करी कां वाचा ॥ १ ॥ ताठा तारुण्याचा आंगीं । श्रेष्ठपण भोगी जगीं ॥२॥ चालतो उताणा । पुच्छेविण बांडा सुना ॥ ३ ॥ तुका ह्मणे फुगे । सान ताठलीं सर्वांगें ॥ ४ ॥

॥ ५९२२ ॥ तारुण्यें मातला । विद्यागर्वें ताठा आला ॥ १ ॥ काय म्हणावें तयासी । खर उकरड्या राशी ॥ २ ॥ नेणे वेळ ते अवेळ । दुष्ट भुंके सर्वकाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे कर्म । कधीं न साहवे श्रम ॥ ४ ॥

॥ ५९२३ ॥ जातीचे ओशाळे । कधीं न सांडिती चाळे ॥ १ ॥ ऐशी अभाग्याची मती । नर्का कळोनियां जाती ॥ २ ॥ नेणें कांहीं हीत । बळें आणितो अघात ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेळ जाय । मग करी हाय हाय ॥ ४ ॥

॥ ५९२४ ॥ नेणे मंदमती । कैसी करूं भावभक्ति ॥ १ ॥ नेणे विठोबाचें नाम । भ्रम लावी क्रोध काम ॥ २ ॥ लोभ मद अंगिकारी । यमपाश मैंद करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे आलें । व्यर्थ वय वांयां गेलें ॥ ४ ॥

॥ ५९२५ ॥ गाई मारी बदवश । दोष सदा विप्राचा ॥ १ ॥ सूर्यमंडळ पाहे डोळां । क्रोध चांडाळा नावरे ॥ २ ॥ करी भाविकासी द्वेष । सांची दोष पदरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐशियाचा । संग साचा न व्हावा ॥ ४ ॥

॥ ५९२६ ॥ नेणे स्वहिताचा लेश । राशी सांचियले दोष ॥ १ ॥ साची न करिती कींव । नाहीं नारायणीं भाव ॥२॥ पराव्याचे गुण दोष । पाहे निंदी सावकाश ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशा नरा । यमपुरीं वस्ती थारा ॥ ४ ॥

॥ ५९२७ ॥ चित्त अधर्मी ओंगळ । घात करिती कावळ ॥ १ ॥ मुखें बडबडी नर्क । दुष्ट छळिती भाविक ॥ २ ॥ कीर्तनाचा राग । करी मनोदय-भंग ॥ ३ ॥ तुका ह्मणे पापें । जाती नरका अकल्पें ॥ ४ ॥

॥ ५९२८ ॥ सोसुनियां घोर तप । जोडी पाप सांचिलें ॥ १ ॥ छेदी भाविकांचें प्रेम । बोले वर्म दाटूनी ॥ २ ॥ मांडी छळुनियां भक्ति । जना युक्ति दावितो ॥ ३ ॥ तुका ह्मणे नर्का जात । चित्तीं घात पराचा ॥ ४ ॥

॥ ५९२९ ॥ मुखीं वदे अमंगळ । छळी खळ भाविकां ॥ १ ॥ सदा अविचारी मस्ती । पाप वस्ती सांचिली ॥ २ ॥ कुष्ट मुखें बडबडी । बुद्धी कुडी न सांडी ॥ ३ ॥ वाटे जनाचिया भये । केश डोये वाढवी ॥ ४ ॥ तुका ह्मणे व्हावें दुरी । तोंडावरी थुंकोनी ॥ ५ ॥

॥ ५९३० ॥ लांच घेऊनियां ग्वाही । देती पाही सभेंत ॥ १ ॥ धर्म न विचारी नीत । अधःपात साधिला ॥ २ ॥ गेलें यश सत्व धीर ॥ ते अघोर जोडिती ॥ ३ ॥ नये पूर्वजांसी वस्ती । अधोगती हिंडती ॥ ४ ॥ तुका ह्मणे कुलांगार । जोडी खर वांयां तें ॥ ५ ॥

॥ ५९३१ ॥ झालासी शहाणा । होसी संसारवहाणा ॥ १ ॥ भारें नमताती खर । चाले चोरटें मांजर ॥ २ ॥ हाणितां टाळेंत । नेणें होतसे फजित ॥ ३ ॥ तुका न मनीं तिकीर । म्हणे हड हड शिर॥ ४ ॥

॥ ५९३२ ॥ सांगतांही नाइकती । करूं किती फजित ॥ १ ॥ अवगुणी अप्रमादि । दुर्बुद्धि ते मांजरी ॥२॥ नेघे शिकवी हें कडू । माकडूं हिता नेणें ॥ ३ ॥ तुका म्हणे क्रोध उठी । बुद्धि खोटी सांडीना ॥ ४ ॥

॥ ५९३३ ॥ बेट्या सांगतां नाईके । दाटबळें भोगी नर्क ॥ १ ॥ नर लेखी सद्गुरुसी । भस्म आयुष्याच्या राशी ॥ २ ॥ लाजे संता नमस्कारा । धन आयुष्याचा चुरा ॥ ३ ॥ तुका म्हणे सांगों किती । काळकुष्टआंग होती ॥ ४ ॥

॥ ५९३४ ॥ आयुष्य जयासी बहु असे वृद्धि । वडिलांची बुद्धि श्रेष्ठ
होय ॥ १ ॥ आणिली मांडवा बुद्धिसी विचारा । नाहीं वोढावारा सुखा-
लागीं ॥ २ ॥ आला मेला वर रांड लक्ष्मी आणा । कुंभ शिरीं जाणा भरु-
नियां ॥ ३ ॥ मुद ओंवाळावी सांडा धोंडामाती । ओंवाळा आरती मुडतर
॥ ४ ॥ शोभनीं अशुभ थोरपण कैसें । बुद्धिसी प्रकाश आवडीसी ॥ ५ ॥
तुका ह्मणे काढा बाहेरी येथूनी ॥ याहूनी दुरूनी वेगळाची ॥ ६ ॥

॥ ५९३५ ॥ देवाचें पूजन न करीच भावें । वेश्येलागीं द्यावे आलं-
कार ॥ १ ॥ ब्राम्हण अतीथि न घडे पंगती । दासीलागीं प्रीति जेऊं
घाली ॥ २ ॥ कुटुंबाची सेवा करितां विटेना । संतांच्या पूजना विट मानी
॥ ३ ॥ करी अनाचार श्वानालागीं क्षेम । नाहीं नित्य नेम स्वप्नामाजी
॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं कुळधर्म ठावा । यमाचा जाणावा पाहुणा तो ॥५॥

॥ ५९३६ ॥ बाळपणीं लळे खेळतोचि वांया ॥ नेणपण जाया ऐसें
गेलें ॥ १ ॥ कैसा तारूण्यांत कोणासी न मानी । वसे ताठा मनीं अभि-
मान ॥ २ ॥ अंगाचिया मदें न बोले कोणासी । डोळे ते पाठीसी नेले
तेणें ॥ ३ ॥ चवढ्यावरी चाले मिशांवरी हात । विषयासी हित मेंढा जैसा
॥ ४ ॥ कैसी वृद्धपणीं अशक्तता आली । इंद्रियें आपुलीं पारखी तो ॥५ ॥
तुका ह्मणे अंतीं वैसे यमदंड । पाप पुण्य लंड न विचारी ॥ ६ ॥

॥ ५९३७ ॥ नाहीं वेदश्रुती ग्रंथाचें श्रवण । श्रेष्ठाचें वचन न मानी तो
॥ १ ॥ नाम नावडे तो करील बोहरी ॥ १ ॥ नाहीं त्याची खरी चित्त
शुद्धी ॥ २ ॥ चोरी जारी मारी म्हणतां थरारे ॥ कांहीं तो न स्मरे हरिनाम
॥ ३ ॥ तुका ह्मणे जळो जळो त्याची मति । लटिकी ते स्फिती ना-
माविण ॥ ४ ॥

॥ ५९३८ ॥ नाहीं भूत दया जया । थोर ह्मणवी कासया ॥ १ ॥
नाहीं दया धर्म चित्तीं । व्यर्थ दंभत्वें मरती ॥ २ ॥ भूतदयेची वासना ।
कदां नुपजे पाषाणा ॥३॥ तुका ह्मणे शांती । नये सापासीं श्रीपती ॥ ४ ॥

॥ ५९३९ ॥ पंडितांनीं भक्ति मारग उदेला । करी गलबला विवा-
दाचा ॥ १ ॥ नाहीं वर्म ठावें आहें मी कवण । कोठील हें कोण कैचें
एथें ॥ २ ॥ सांडिला आचार सत्कर्म हा नेम । पोटापाठीं श्रम राजद्वारीं
॥ ३ ॥ एका निषेधासी एकाशीं स्थापावें । तेणें काय द्यावें योग्य होतें
॥ ४ ॥ तुका ह्मणे जातां मारग चुकला । मूल गलबला करीतसे ॥ ५ ॥

॥ ५९४० ॥ भूषण जगांत तुवां तें साधिलें । धन सांपडलें विद्या थोर ॥ १ ॥ तयामाजि सार कोणता प्रकार । ऐसा हा विचार न पाहेचि ॥ २ ॥ मीच श्रेष्ठ ज्ञानी सांगतो कहाणी । पंडित होऊनी दारोदारीं ॥ ३ ॥ एकासी छळावें वादप्रतिवादीं । भाविकासी निंदी मूढ म्हूण ॥ ४ ॥ यांत तुला काय लागलेंसे हातीं । विवाद प्रवृत्ति काय काज ॥ ५ ॥ तुका ह्मणे मुर्खा न कळेचि देखा ॥ हातासी मृत्तिका तेही नये ॥ ६ ॥

॥ ५९४१ ॥ देखोनियां उणें पाहोनियां छिद्रा । बाहीर सा मुद्रा अपवित्र ॥ १ ॥ सज्जनासी छळी शब्द नरकाडी । कुशब्दाची जोडी सदा करी ॥ २ ॥ कोण्यापरी चित्त भेदावें अंतर । ऐसें सा साचार बोल बोले ॥ ३ ॥ पापाची हे मूर्ती घडलिसे वोजा । दुर्जनाची पूजा पीडा करी ॥ ४ ॥ तुका म्हणे दुःख दुर्जनाच्या संगें । होय मनोभंग वेळोवेळा ॥ ५ ॥

॥ ५९४२ ॥ पतनाचि जोडी साधियेली मुखें । हरिखांत विख कालविलें ॥ १ ॥ न मिळे खावया राहिले उपाय । म्हणोनियां जाय धेडवाडा ॥ २ ॥ न करीच संध्या न करीच जप । साधियलें पाप मुर्खपणें ॥ ३ ॥ न मिळे व्यापार घालितसे खिस्ती । यमपुरी वस्ती करावया ॥ ४ ॥ तुका म्हणे रांड उपजतां तरी । मारूनी निर्धारीं टाकी ना कां ॥५॥

॥ ५९४३ ॥ स्नान संध्या करी जप । खतें पाप वावरे ॥ १ ॥ गोडी मिष्टान्नाची धरी । ब्रम्हचारी म्हणती ॥ २ ॥ हानी आली लाभ नाहीं । आदा पाही वेंचिला ॥ ३ ॥ वारी नित्य अन्न खाय । केलें काय रांडेच्या ॥ ४ ॥ तुका म्हणे जिव्हा शिस्न । हीं प्रयत्नें बांधावीं ॥ ४ ॥

॥ ५९४४ ॥ मागें तेंचि नाहीं ठावें । तोंडवासी कांहीं द्यावें ॥ १ ॥ झालें लोभाचें मांजर । भिक मागें दारोदार ॥ २ ॥ कोणा वंदी कोणा निंदी । धांव घाली भलते छंदीं ॥ ३॥ हातीं माप गोणी । तुका ह्मणे रितीं दोन्ही ॥ ४ ॥

॥ ५९४५ ॥ दुर्जनाचें चित्त सज्जनातें छळी । जोडी पाप वळी वज्र लेप ॥ १ ॥ काय करूं यासी सांगतां नायके । जोडितो पातकें पापराशी ॥ २ ॥ काय आह्मी कधीं कोणाचे अन्याय । करितों मी काय सांगा तरी ॥ ३ ॥ न जाईच कदा कोणाचिये घरीं । अपेक्षा निर्धारी छळावया ॥४॥ न बोले चि देखे कोणाचें वाईट । उणें पुरें नीट खरें खोटें ॥५॥

कोणापें वसणें कोणासी बोलणें ॥ आणिका सांगणें काम नाहीं ॥ ६ ॥ तुका ह्मणे देव मज ऐशी परी । तुम्ही सुखें घरीं निद्रा करा ॥ ७ ॥

॥ ५९४६ ॥ दुर्जनाशीं बुद्धि शिकवितां कांहीं । पामें भिजत नाहीं धोंडा जैसा ॥ १ ॥ रोगिया मिष्टान्न मर्कटा चंदन । कागासी लेपन कर्पुराचें ॥ २ ॥ निर्नयनासी जैसा नावडे आरीसा । मुर्खालागीं तैसा शास्त्र बोध ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसें दिकल उदारें । अज्ञान अंधार दूरी केलें ॥ ४ ॥

॥ ५९४७ ॥ आणा सुगरणी । व्याही बैसले भोजनीं ॥ १ ॥ नेणे समय हा कोण । कोठें वाहते येऊन ॥ २ ॥ एक मागावें आवडी । काय भलत्यासी वाढी ॥ ३ ॥ तुका म्हणे अप्रमादीं । नाइकोचि कदा बुद्धी ॥ ४ ॥

॥ ५९४८ ॥ अनमानवणी । मुख्य वराडी विहिणी ॥ १ ॥ जरा खोकली ते मुग्धा । व्याह्या पात्रीं झाली श्रद्धा ॥ २ ॥ हांसविलें जन । पावोनियां अपमान ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐशा गुणीं । श्रेष्ठपणा आली हाणी ॥ ४ ॥

॥ ५९४९ ॥ निंदी हरीदासा कोणी । नर्कखाणी पडे तो ॥ १ ॥ खऱ्यासी पाडी खोटें । शिखी नष्ट तो एक ॥२॥ साच सांडी खरी वस्त । अधःपात पावला ॥ ३ ॥ तुका म्हणे सांगों काय । घडों नये सान्निध ॥४ ॥

॥ ५९५० ॥ परब्रम्ह नकळे ज्यासी । काय उपदेश त्यासी ॥ १ ॥ करावे ते नर । ज्ञानाविण ते सुंदर ॥ २ ॥ गुरुमंत्र घेती कानीं । अनाचार धरिती मनीं ॥ ३ ॥ लाजे साधुदर्शनासी । परद्वारीं नाक घांशी ॥ ४ ॥ हरीकथेचा कंटाळा । द्रव्य वेंचि भोरप्याला ॥ ५ ॥ तुका म्हणे ऐसा नर । त्यासी यम देती मार ॥ ६ ॥

॥ ५९५१ ॥ जयाचिये द्वारीं तुळसीवृंदावन । नाहीं तें स्मशान घर त्याचें ॥ १ ॥ जये कुळीं नाहीं एकही वैष्णव । त्याचा बुडे भवनदी तापा ॥ २ ॥ विठोबाचें नाम नुचारी जें तोंड । प्रत्यक्ष तें कुंड रजकाचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचे काष्ट हातपाय । किर्तना नवजाय हरीचिया ॥ ४ ॥

॥ ५९५२ ॥ ऐका ज्यानें विकली कन्या । पवाडे त्या सुण्याचे ॥ १ ॥ नरमांस खादली भाडी । हाडाहाडी ह्मणउनी ॥ २ ॥ तुका ह्मणे कोरान्न रांड । बेटा भांड मागेचना ॥ ३ ॥

॥ ५९५३ ॥ आपण वेगळा विराटू । लागे भक्तीचा चाटू ॥ १ ॥ तोंडीं सांगे याग । पाठीमागें विषय भोग ॥ २ ॥ काय त्याचें ब्रह्मज्ञान । हें तो निकाचें साधन ॥ ३ ॥ अंगीं नाहीं भूतदया । तुका ह्मणे गेले वांयां ॥ ४ ॥

॥ ५९५४ ॥ नामाविण नर । जैसा कुंभाराचा खर ॥ १ ॥ वरी बैसोनियां जाती । माती भरोनी घरा येती ॥ २ ॥ सारा दिवस घरा येतो। सांज झाली सोडुनी येतो ॥ ३ ॥ तुका ह्मणे हेचि खट । खातो नरका भरली वाट ॥ ४ ॥

॥ ५९५५ ॥ लोकां सांगे ब्रम्हज्ञान । आपण कोरडा पाषाण ॥ १ ॥ जेणें ज्ञान कां सांगावें । ज्ञानासारिखें वर्तावें ॥ २ ॥ नित्य वाची ज्ञानेश्वरी । दारीं भिकाऱ्यासी मारी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे लंड । आह्मी वाहिलें उदंड ॥ ४ ॥

॥ ५९५६ ॥ देखोदेखी बैसे संताचे संगती । परी नाहीं चित्तीं प्रेम भाव ॥ १ ॥ पायांवरी पडे गडबडा लोळे । अंतरीं डोहळे दुष्टांचे ॥ २ ॥ पाखांडानें माझा पुरविला दुमाळा । काय मी विठ्ठला बोलूं येथें ॥ ३ ॥ तुका ह्मणे खिळ पडो त्याच्या तोंडा । न बोलवे भांडा ऐशासवें ॥ ४ ॥

॥ ५९५७ ॥ कांरे निजलासी निदसुरा । जागा होय फजितखोरा ॥ १ ॥ निद्रा काळाची बहिण । भुक केवळ राक्षसीण ॥ २ ॥ आळस कुटुंबाचा वैरी । त्याणें बहु केला भिकारी ॥ ३ ॥ ऐसा आळसाचा परिवारी । हिंडतसे दारोदारीं ॥ ४ ॥ करी आळसाचा त्याग । जोडी नारायण श्रीरंग ॥ ५ ॥ तुका ह्मणे शिंदळीच्या । सोई धरी गाढवीच्या ॥ ६ ॥

॥ ५९५८ ॥ पिता सांगे पुत्रापाशीं । नको जाऊं पंढरीसी ॥ १ ॥ तेथें आहे एक भुत । भुतें झडपिले बहुत ॥ २ ॥ भुतें झडपिलें नारदा । धुरू आणि गा प्रल्हादा ॥ ३ ॥ भुत गोकुळासी गेलें । भुतें गोपाळ झडपिले ॥ ४ ॥ भुत पंढरीस आलें । भुतें पुंडलिका गोविलें ॥ ५ ॥ तुका सांगे जन्म जगो । भुत जन्मोजन्मी लागो ॥ ६ ॥

॥ ५९५९ ॥ झाला स्त्रियेसी लंपट । मायबापासी उद्धट ॥ १ ॥ नेणे माय न मावभय बापाचें न धरी । निंदा सज्जनाची करी ॥ २ ॥

सी । तेणें सांगावें कवणासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे लंड । आह्मी पाहिले उदंड ॥ ४ ॥

॥ ५९६० ॥ ज्ञान सांगे पोटभरी । करणी अज्ञानाची करी ॥ १ ॥ बाह्यात्कारें होय लीन । अंतरींचा भाव भिन्न ॥ २ ॥ शब्दज्ञान सांगे गोष्टी । अनुभव नाहीं पोटीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे लंड । आह्मी पाहिले उदंड ॥ ४ ॥

॥ ५९६१ ॥ अनुताप नाहीं चित्तीं । काय वाचोनियां पोथी ॥ १ ॥ चित्तीं नाहीं अनुताप । काय करुनियां जप ॥ २ ॥ गिता वाचे ज्ञानेश्वरी । भिकाऱ्याला काठया मारी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावकर्म । काय केल्या न सुटे वर्म ॥ ४ ॥

॥ ५९६२ ॥ जितां पित्याची आबळ करी । मेल्या गौदान ब्राम्हणा करी ॥ १ ॥ ऐसा कलियुगीं विचार । क्रियानष्ट झाले नर ॥ २ ॥ जितां दुःखाचे डोंगर । करिती प्रेताचा आदर ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे नष्ट । ते भोगिती अति कष्ट ॥ ४ ॥

---

## दांभिकांस शिक्षा.

॥ ५९६३ ॥ माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ॥ १ ॥ तंव तया पारखी सिव । लाजे ठाव सांडितां ॥ २ ॥ उष्टावळी करूनि जमा । कुंथुनि प्रेमा आणितसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाहेरमुदी । आहाच गोविंदीं न सरती ॥ ४ ॥

॥ ५९६४ ॥ वृत्ति भूमि राज्य द्रव्य उपार्जिती । जाणा सा निश्चितीं दंत नाहीं ॥ १ ॥ भाडेकरी वाहे पाठीवरी भार । अंतरींचें सार लाभ नाहीं ॥ २ ॥ देवपूजेवरी ठेवोनियां मन । पाषाणा पाषाण पूजी लोभें ॥ ३ ॥ तुका ह्मणे फळ चिंतिती आदरें । लाघव हे चार शिंदळीचे ॥ ४ ॥

॥ ५९६५ ॥ माया ब्रह्म ऐसें ह्मणती धर्मठक । आपणासरिसे लोक नागविले ॥ १ ॥ विषयीं लंपट शिकवी कुविद्या । मनामागें नांद्या होऊनि फिरे ॥ २ ॥ करुनी खातां पाक जिरे सुरण राई । करितां अतिसाई दुःख पावे ॥ ३ ॥ औषध द्यावया चाळविलें बाळा । दावूनियां गुळा दृष्टी-

पुढें ॥ ४ ॥ तरावया आधीं शोधा वेदवाणी । वांजट बोलणीं वारा सांचीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे जयां पिंडाचें पाळण । न घडे नारायणभेट तयां ॥ ६ ॥

॥ ५९६६ ॥ कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥ १ ॥ गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातिशी कारण नाहीं देवा ॥२॥ जे जंई केलें तैसें ते पावती। भोग ते भोगिती केले कर्मी ॥३॥ आशाबद्ध नये करूं तें करिती । तुका ह्मणे जाती नरकामधीं ॥ ४ ॥

॥ ५९६७ ॥ चित्तीं नाहीं तें जवळीं असोनि काय । वत्स सांडी माय तेणें न्यायें ॥१॥ प्रीतीचा तो वायु गोड लागे मात । जरी जाय चित्त मिळोनियां ॥ २ ॥ तुका ह्मणे अवघें फिकें भावाविण । मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ॥ ३ ॥

॥ ५९६८ ॥ काय काशी करिती गंगा । भीतरिं चांगा नाहीं तो ॥ १ ॥ अधणीं कुचर बाहेर तैसा । नये रसा पाकासि ॥ २ ॥ काय टिळे करिती माळा । भाव खळा नाहीं त्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे प्रेमें विण । बोले भुंके अवघा शीण ॥ ४ ॥

॥ ५९६९ ॥ आमचे गोसावी अयाचितवृत्ति । करवी शिष्याहातीं उपदेश ॥ १ ॥ दगडाची नाव आधीं च ते जड । ते काय दगड तारूं जाणे ॥२॥ तुका ह्मणे वेष विटंबिला त्यांनीं । सोंगसंपादणी करिती परी ॥ ३ ॥

॥ ५९७० ॥ भजन घाली भोगावरी । अकर्त्तव्य मनीं धरी ॥ १ ॥ धिग त्याचें साधुपण । विटाळूनी वर्ते मन ॥ २ ॥ नाहीं वैराग्याचा लेश । अर्थचाड जीवें आस ॥ ३ ॥ हें ना तैसें झालें । तुका ह्मणे वांयां गेलें ॥ ४ ॥

॥ ५९७१ ॥ आचरणा ठाव । नाहीं अंगीं स्वतां भाव ॥ १ ॥ करवी आणिकांचे घात । खोडी काढूनि पंडित ॥ २ ॥ श्वानाचिया परी । मिष्टान्नासि विटाळ करी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा । सटवेचिना पांचा दिसां ॥ ४ ॥

॥ ५९७२ ॥ करिसी तें देवा करीं माझें सुखें । परी मी त्यासी मुखें न ह्मणे संत॥१॥ जया राज्य द्रव्य करणें उपार्जना । वश दंभमाना इच्छे झाले ॥ २ ॥ जगदेव परी निवडीन निराळे । ज्ञानाचें आंधळे भारवाही ॥ ३ ॥ तुका ह्मणे भय न धरीं मानसीं । ऐसियाचे विशीं करितां दंड ॥ ४ ॥

॥ ५९७३ ॥ ह्मणविती ऐसे आइकतों संत । न देखिजे होत डोळां कोणीं ॥ १ ॥ ऐसियांचा कोण मानितें विश्वास । निवडे तो रस घाईं डाईं ॥ २ ॥ पर्जन्याचे काळीं वाहाळाचे नद । ओसरतां बुंद न थारेचि ॥ ३ ॥ हिऱ्या ऐशा गारा दिसती दुरोन । तुका म्हणे घन न भेटे तों ॥ ४ ॥

॥ ५९७४ ॥ अतिवाद लावी । एक बोट सोंग दावी ॥ १ ॥ साचा बहुरूपी नट । नव्हे वैष्णव तो चाट ॥ २ ॥ प्रतिपादी वाळी । एक पुजी एक छळी ॥ ३ ॥ तुका म्हणे नाहीं । भूतदया ज्याचे ठायीं ॥ ४ ॥

॥ ५९७५ ॥ पोटाचे ते नट पाहों नये छंद । विषयांचे भेद विषयरूप ॥ १ ॥ अर्थी परमार्थ कैसा घडों सके । चित्त लोभी भीके सोंग वांयां ॥ २ ॥ देवाचीं चरित्रें दाखविती लीळा । लाघवाच्या कळा मोहावया ॥ ३ ॥ तुका म्हणे चित्तीं राहे अभिळास । दोघां नरकवास सारिखाचि ॥ ४ ॥

॥ ५९७६ ॥ भुंकती तीं द्यावीं भुंकों । आपण त्यांचें नये शिकों ॥ १ ॥ भाविकांनीं दुर्जनाचें । मानूं नये कांहीं साचें ॥ २ ॥ होइल तैसें बळ । फजीत करावे ते खळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्यांचें । पाप नाहीं ताडणाचें ॥ ४ ॥

॥ ५९७७ ॥ जप करितां राग । आला जवळी तो मांग ॥ १ ॥ नको भोंवतालें जगीं । पाहों जवळी राख अंगीं ॥ २ ॥ कुड्याची संगती । सदा भोजन पंगती ॥ ३ ॥ तुका म्हणे ब्रह्म । साधी विरहित कर्म ॥ ४ ॥

॥ ५९७८ ॥ बोली मैंदाची बरवी असे । वाटे अंतरीं घालावे फांसे ॥ १ ॥ कैसा वरिवरि दिसताहे चांग । नव्हे भाविक केवळ मांग ॥ २ ॥ टिळा टोपी माळा कंठीं । अंधारीं नेऊनि चेंपी घांटी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तो केवळ पुंड । त्यावरि वाजती यमदंड ॥ ४ ॥

॥ ५९७९ ॥ आशाबद्ध वक्ता । धाक श्रोतयाच्या चित्ता ॥ १ ॥ वांयां गेलें तें भजन । उभयतां लोभी मन ॥ २ ॥ बहिर्मुख एके ठायीं । तैसें झालें तया दोहीं ॥ ३ ॥ माप तैसी गोणी । तुका ह्मणे रितीं दोन्ही ॥ ४ ॥

॥ ५९८० ॥ वरि बोला रस । कथीं ज्ञान माजी फोस ॥ १ ॥ ऐसे लटिके जे ठक । तयां इह ना पर लोक ॥ २ ॥ परिस एक सांगे । अंगा धुळी हे न लगे ॥ ३ ॥ तुका ह्मणे हाडें । कुत्र्या लाविले झगडे ॥ ४ ॥